# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

मुख्य प्रशासकीय इमारत,टाऊन हॉल,

छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

जा.क्र.मनपा/आस्था-1/2023/ 1955 दिनांक -27/12/2023.

## जाहीर प्रगटन

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेची एकूण 114 पदे भरण्याबाबतची जाहिरात जा.क्र. मनपा/आस्था-1/2023/1234. दि.18/08/2023 अन्वये प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यानुसार छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील गट-क मधील विविध संवर्गातील सरळसेवेने रिक्त पदे भरण्याबाबत प्रस्तुत जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे शैक्षणिक अर्हता व इतर बाबींची पूर्तता करणा-या पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आले होते.

करिता याद्वारे कळविण्यात येते की, खालील पदांची लेखी परीक्षा **दि.03/01/2024** ते **दि.05/01/2024** रोजी जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या शहरातील परीक्षा केंद्रावर होणार आहेत.

| परीक्षेची तारीख | परीक्षेचा वेळ | सत्र | पदाचे नांव |
|---|---|---|---|
| दि.03/01/2024 (बुधवार) | सकाळी 08.30 | प्रथम सत्र | 1) कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)<br>2) कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल)<br>3) पशुधन पर्यवेक्षक |
| | दुपारी 12.30 | द्वितीय सत्र | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक/अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण निरीक्षक |
| | दुपारी 04.30 | तृतीय सत्र | कनिष्ठ अभियंता (विद्युत) |
| दि.04/01/2024 (गुरुवार) | सकाळी 08.30 | प्रथम सत्र | 1) लेखापाल<br>2) उद्यान सहाय्यक<br>3) विद्युत पर्यवेक्षक |
| | दुपारी 12.30 | द्वितीय सत्र | स्वच्छता निरीक्षक |
| | दुपारी 04.30 | तृतीय सत्र | 1) कनिष्ठ लेखा परीक्षक<br>2) लेखा लिपीक |
| दि.05/01/2024 (शुक्रवार) | सकाळी 08.30 | प्रथम सत्र | लेखा परीक्षक |

सदर परीक्षेकरिता संबंधित उमेदवारांना SMS/Email द्वारे माहिती देण्यात येत आहे. तसेच छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या अधिकृत वेबसाईट www.aurangabadmahapalika.org किंवा www.chhsambhajinagarmc.org मधील Recuritment 2023 (पदभरती 2023) मध्ये Call letter बाबत दिलेल्या लिंकवरुन उमेदवारांनी परीक्षा प्रवेशपत्र Download करुन घ्यावे. परीक्षा केंद्र व वेळ हे प्रवेशपत्रावर नमूद केल्याप्रमाणेच राहील. तसेच याबाबत काही अडचण निर्माण झाल्यास उमेदवारांनी http://cgrs.ibps.in/ या लिंकवर अथवा 1800222366 / 18001034566 या हेल्पलाईनवर संपर्क साधावा. परीक्षेच्यावेळी उमेदवाराकडे प्रवेशपत्र नसल्यास उमेदवारास परीक्षेकरिता प्रवेश दिला जाणार नाही व याबाबत सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील.

सदर परीक्षा ही आय.बी.पी.एस. या शासनमान्य संस्थेमार्फत घेण्यात येणार असून नोकरी लावून देतो अशा कुठल्याही आमिषाला किंवा भुलथापांना बळी पडू नये. नोकरी लावून देणेसंदर्भात कोणी पैश्याची मागणी केल्यास पोलीसांकडे तक्रार करावी किंवा महानगरपालिका मुख्यालयाशी संपर्क साधावा.

आपणास परीक्षेसाठी हार्दिक शुभेच्छा !

दिनांक : 27/12/2023

ठिकाण : छत्रपती संभाजीनगर

(रणजित पाटील)
अतिरिक्त आयुक्त-1
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका